| | | |
|---|---|---|
| **MHLA**030019582025 | दाखल दिनांक | – ११.०९.२०२० |
| | नोंदणी दिनांक | – ११.०९.२०२० |
| | निकाल दिनांक | – १०.०८.२०२६ |
| | कालावधी | – वर्षे महिने दिवस |
| | | ०५ १० २९ |

**<u>अहेरी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात</u>**

(पिठासीन अधिकारी श्रीनिवास एच. पांचाळ)

न्यायनिर्णय घोषीत दिनांक – १० ऑगस्ट, २०२६

**(संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३०१/२०२०)** **निशाणी क्रमांक–०७ पुढे**

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | | महाराष्ट्र शासनातर्फे,<br>पोलीस स्टेशन, अधिकारी,<br>पोलीस स्टेशन अहेरी, ता. अहेरी,<br>जि. गडचिरोली. |
| फिर्यादी पक्षातर्फे | | सरकारी वकील :–<br>श्री.सुधाकर पारधी/श्री. आर.एस. उंदिरवाडे |
| आरोपी | | **भद्रेश्वर शंकर देशमुख,**<br>वय– २३ वर्षे, व्यवसाय– मजुरी,<br>रा. गुडेम, ता. सिरपूर, जि. आसिफाबाद,<br>राज्य तेलंगाना. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | वकील श्री. सतिश एस. जैनवार. |

**<u>भाग–ब</u>**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | ०१/०२/२०२० |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | ०१/०२/२०२० |

| | | |
|---|---|---|
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :- | ११/०२/२०२० |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | १०/०८/२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | २८/०२/२०२३ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | १०/०८/२०२६ |
| न्यानिर्णय दिनांक | :- | १०/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | आरोपीला निर्दोषमुक्त करण्यात येते. |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्रं. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | भद्रेश्वर शंकर देशमुख | ०१/०२/२०२० | ०३/०२/२०० | महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ कलम ६५ (अ) | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग–क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र. १ | रविंद बालाजी चौधरी नि.क्रं. ७ पुढे | फिर्यादी |
| सा.क्र.२ | धनराज नारायण दुर्गे नि.क्रं. ७ पुढे | घटनास्थळ पंच |

| | | |
|---|---|---|
| सा.क्र.३ | धर्मेंद्र गणपत रामटेके नि.क्रं. ७ पुढे | पंच साक्षदार |

## अभियोग पक्ष/बयाव पक्ष/ न्यायालयाने दिलेल्या निशाणीबध्द दस्तांची यादी

**अ. अभियोग पक्ष:**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी **पी–०९**/स.सा.क्र.०१ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | निशाणी **पी–१०**/स.सा.क्र.०१ | मालमत्ता शोध नमुना |
| ३. | निशाणी **पी–११**/स.सा.क्र.०१ | सी.ए. फार्म |
| ४. | निशाणी **पी–१२**/स.सा.क्र.०१ | खबर |
| ५. | निशाणी **पी–१३**/स.सा.क्र.०१ | छापील नमुन्यातील खबर |
| ६. | निशाणी **पी–२२**/स.सा.क्र.०३ | डयुटी पास |
| ७. | निशाणी **पी–२३**/स.सा.क्र.०३ | वापसी रिपोर्ट |
| ८. | निशाणी **पी–२४**/स.सा.क्र.०३ | मुद्देमाल पोच पावती |

**ड. महत्वाच्या वस्तु :**

| अ.क्रं. | महत्वाची वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ५२/२०२० दि. ०१/०२/२०२० | इम्पेरिलय ब्ल्यु कंपनीच्या प्रत्येकी ३७५ एम.एल. मापाच्या २४ नग सिलबंद बॉटला व बॉटलडिस्कव्हे कंपनीची माटारसायल जुनी वापरती बिना नंबरची |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवशक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ०७ | गुन्ह्याचा तपशील व आरोपीचे फौ.प्र.सं. कलम ३१३ अन्वये निवेदन |

## न्या य नि र्ण य

(घोषित दिनांक १० ऑगस्ट, २०२६)

प्रस्तुत आरोपीवर महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ कलम ६५ (अ) प्रमाणे गुन्हा केल्याचा आरोप आहे.

२. **अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की,**

दिनांक ०१/०२/२०२० रोजी फिर्यादी यांना मुखबिरचे खात्रीशीर खबर मिळाली की, आरोपी मौजा बांगपल्ली नदीघाटावरून मोटारसायकलने दारूची वाहतुक करीता आहे. त्यामुळे सदर बातमीवरून त्या ठिकाणी पळत ठेवली असता नमुद आरोपी हा मिळुन आल्याने त्याचे जवळ इंमपेरियल ब्ल्यु कंपनीच्या प्रत्येकी ३७५ एम.एच. मापाच्या २४ नग सिलबंद बॉटला प्रती बॉटल किंमत ५००/– एकुन किंमत १२,०००/– रूपये व मोटारसायकल अंदाजे किंमत २०,०००/– रूपये एस एकुन ३२,०००/– रूपयचा मुद्देमाल मिळून आला. म्हणुन नमुद आरोपी विरुध्द महाराष्ट्र दारु बंदी कायदा कलम ६५ (अ) अन्वये फिर्याद दाखल करण्यात आली. सदर प्रकरणी तपासाचे काम तपासी अधिकारी पो.हवा./१६५० ताराचंद बी. अलोने यांनी केलेला आहे. सविस्तर घटनास्थळ, जप्ती पंचनामा करून साक्षीदारांचे जाब जबाब नोदविले. तपासातअंती वरील नमुद प्रमाणे आरोपी अवैध्यरित्या विनापासपरवाना विदेशी दारू बाळगुन मोटारसायकलने विक्री करणे करीता दारूची वाहतुक केल्याचे निशपन्न झालयाने आरोपीविरूध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

३. सदर प्रकरणी आरोपी हजर झाले असता निशाणी क्र.०७ प्रमाणे गुन्ह्याचा तपशील त्यांना मराठीमध्ये वाचून व समजावून सांगण्यात आला आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारु बंदी कायदा कलम ६५ (अ) अन्वये दोषारोप निश्चित करण्यात आले. आरोपीने गुन्हा अमान्य करुन संपरिक्षेस सामोरे जाण्याची समर्थता दर्शविली.

४. सदर आरोपी विरुद्ध पुरावा आल्याने आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे जबानी निशाणी क्रमांक ०७ पुढे घेण्यात आली. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.आर.एस. उंदिरवाडे व आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. सतिश एस. जैनवार यांचा युक्तीवाद ऐकला. वर्दीदारने केलेले कथन, आरोपीने घेतलेला बचाव, अभिलेखावर आलेला पुरावा या सर्व परिस्थितीचा सारासार विचार केला असता खालील बाबी विचाराधीन उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे.

| *अ.क्र.* | *विचाराधीन बाबी* | *निष्कर्ष* |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने ही बाब सिध्द केली का की, दि.०१/०२/२०२० रोजी वांगेपल्ली नदीघाटावरून आरोपी हा विनापासपरवाना बेकायदेशिररित्या चोरटी विक्री व्यवसाय करणे करीता विदेशी दारु वाहतुक करतांना मिळून आला व त्यानुसार महाराष्ट्र दारु बंदी कायदा कलम ६५ (अ) प्रमाणे गुन्हा केला आहे ? | नाही. |
| २. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## <u>*का र ण मि मां सा*</u>

५. अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द आरोप सिध्द करण्याकरिता तीन साक्षीदार तपासलेले आहेत. फिर्यादी रविंद्र बालाजी चौधरी (सा.क्र.१), घटनास्थळ पंच धनराज नारायण दुर्गे (सा.क्र.२) व पंच साक्षदार धमेंद्र गणपत रामटेके (सा.क्रं.३) यांची साक्ष निशाणी क्र. ०७ पुढे नोंदविली आहे.

**<u>मुद्दा क्र.०१ व ०२ बाबत –</u>**

**६.** अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. १ फिर्यादी दविंद्र चौधरी यांनी त्यांचे सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, दि. ०१.०२.२०२० रोजी ते अहेरी पोलीस ठाण्यात कार्यरत असतांना मुखविराकडुन खबर मिळाली की, मौजा वांगेपल्ली नदीघाट येथे आरोपी दारू वाहतुक करीता आहे. म्हणून साक्षदार क्रं १ व ईतर पोली कर्मचारी पंचासह तिथे गेले असता आरोपीच्या ताब्यात आयबी कंपीनीच्या ३७५ मिली मापाच्या २४ बाटला व त्यात दारूसाठा मिळाला. पंचांनी ती दाय असल्याचे सांगीतल्याने त्यानी तो मुद्देमाल जप्त केला. पंचासमक्ष प्रत्येकी एक नमुना रायासनिक विश्लेषनासाठी काढण्यात आला. तो नमुना कागदी सिल लावुन सिलबंद केला. त्याबाबत जप्ती पंचनामा तयार केले. तसेच जप्तीपत्रक/मालमत्ता शोध नमुना तयार केले. त्यानंतर पोली ठाण्यात येवुन साक्षदार क्रं १ यांनी खबर दीली. अभियोग पक्षाचे साक्षदार क्रं.२ घटनास्थळ पंच धनराज दुर्गे यांनी त्यांचे सरतपासणीमध्ये असे कथन केले आहे की, दि. ०१.०२.२०२० रोजी पोलीसांनी पंच म्हणुन बोलविले होते. नि.क्रं.९ व १० अनुक्रमे जप्ती पंचनामा व मालमत्ता शोध नमुना खरा असुन त्यावर त्यांची सही आहे. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. ३ पंच साक्षदार दविंद्र चौधरी यांनी त्यांचे सरतपासामध्ये साक्षदार क्रं १ व २ यांचे साक्षीस दुजोरा दिली व पुढे असे कथन केले की, सि.ए. मुद्दैमाल कामी नागपुर येथे दाखल करण्या करीता त्यांची डयुटी लागली होती. त्यांनी दि. ०३.०२.२०२० रोजी मुद्देमाल नागपूर येथे जमन केला व पोचवापती पोली स्टेशनला जमा केला.

**७.** आरोपीतर्फे उपरोक्त साक्षीदारांचा उलटतपास घेण्यात आला. उपरोक्त साक्षीदार क्रं. १ व ३ हे पोलीस कर्मचारी आहेत. तसेच साक्षदार क्रं. २ यांचे उलटतपासनुसार ते पोलीस स्टेशनला पोलीस मित्र म्हणुण काम करीता असल्याने ते सुध्दा अंत: पोलीस कर्मचारीच आहेत. सरकारी पक्षाने कोणताही स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासलेला नाही. तसेच, अभियोग पक्षाने तथाकथित जप्ती

सिद्ध करण्यासाठी कोणताही स्वतंत्र पंच तपासलेला नाही. तसेच प्रकरणामध्ये न्याय्य प्रयोग शाळेचा अहवाल दाखल नाही. म्हणून, जोपर्यंत जप्त मुद्देमाल हा आरोपीच्याच ताब्यातून जप्त केला आहे हे सिध्द होत नाही, तोपर्यंत आरोपीस दोषी ठरवणे योग्य नाही. त्यामुळे उपरोक्त सर्व साक्षिदारांची साक्ष ही आरोपी विरुद्ध गुन्हा सिद्ध करण्यासाठी पुरेशी नाही. त्यामुळे अभियोग पक्षाने आणलेल्या पुराव्यावर विश्वास ठेवून आरोपीने अभिकथीत गुन्हा केलेला आहे असे गृहीत धरुन त्यांना शिक्षा देता येणार नाही.

८. पुरावा कायद्यातील तरतुदी प्रमाणे व महाराष्ट्र दारु बंदी कायद्यातील तरतुदी प्रमाणे आरोपीं विरुध्दचा गुन्हा शाबीतीच्या दृष्टीने तथाकथीत जप्त मुद्देमाल आरोपीच्याच ताब्यात सापडला व सदरहु मुद्देमाल हा दारुच आहे हे जोपर्यंत सिध्द होत नाही तोपर्यंत आरोपीला शिक्षा होऊ शकत नाही. अभियोग पक्ष आरोपींविरुध्द लावलेले दोष सिध्द करण्यास असमर्थ ठरलेला आहे. म्हणून, वरील सर्व कारणास्तव मी मुद्दा क्र.०१ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवितो व मुद्दा क्र.०२ करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

| **<u>आदेश</u>** | |
|---|---|
| १. | आरोपी भद्रेश्वर शंकर देशमुख, यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये मुंबई दारूबंदी अधिनियम कायदा कलम ६५(अ) चे गुन्ह्यातुन निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपीची जामीन कदवा रद्द करण्यात येते व जामीनदाराला देशील जामीनातून मुक्त करण्यात येते. |
| ३. | जप्त मुद्देमाल दारूची यापुर्वी विल्हावाट लावली नसेल तर अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे सदरील मुद्देमालाची कायद्याप्रमाणे विल्हेवाट लावण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क गडचिरोली यांचे कडे पाठवावा. |

| | |
|---|---|
| ४. | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ ची पुर्ततेपोटी आवाहन याचिकेच्या कामी हजर राहण्याकरीता रक्कम रूपये १५,०००/– ची जामीन व वैयक्तिक जातमुचलका द्यावा. |
| | (न्यायनिर्णय खुलया न्यायालयात जाहीर) |

Digitally signed by SHRINIVAS HANUMANT PANCHAL
Date: 2026.08.10 19:01:26 +0530

अहेरी
दिनांक–१०/०८/२०२६

( श्रीनिवास एच. पांचाळ )
प्रथम वर्ग, न्यायदंडाधिकारी,
अहेरी

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी शपथेवर सांगतो की, पी.डी.एफ. न्यायनिर्णयामधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराप्रमाणे शब्द–न–शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव : एस.एन. खांडेकर,
लघुलेखक (श्रेणी–३)

न्यायालयाचे नाव : दिवाणी व फौजदारी न्यायालय, अहेरी.

न्यायनिर्णयाची तारीख : १०/०८/२०२६

मा. पिठासीन अधिकारी यांनी

न्यायनिर्णयावर सही केल्याची तारीख : १०/०८/२०२६

न्यायनिर्णया अपलोड केल्याची तारीख : १०/०८/२०२६